संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# खासदारांची कोटीच्या कोटी उड्डाणे

**सध्या** लोकसभा निवडणूक असल्याने प्रत्येकाकडून लोकशाही हा शब्द इतक्या वेळा वापरला जाईल की त्यातून आपणच लोकशाहीचे एकमेव भक्त आहोत असे दाखवण्याचा प्रयत्न राहील. परंतु या अशाच लोकशाहीच्या बेगडी भक्तांमुळे लोकशाहीची अक्षरशः चेष्टामस्करी सुरू आहे. या निवडणुकीच्या माध्यमातून लोकप्रतिनिधी निवडून जातात किंवा निवडून दिले जातात. त्यांनी स्वतःची पात्रता सिध्द करण्याऐवजी आपण या इतक्या चांगल्या पवित्र लोकशाहीसाठी कसे अपात्र आहोत हेच दाखवून दिलेले दिसते. २०१४ मध्ये ज्यांनी लोकसभा निवडणूक लढवली जे विजयी झाले. त्यापैकी ३३ टक्के खासदारांवर वेगवेगळे गुन्हे असल्याची आकडेवारी समोर आली आहे. तर जवळपास पन्नास टक्के खासदारांकडे पन्नास कोटीपेक्षा जास्त मालमत्ता असल्याचेही आढळून आलेले आहे. एका खाजगी संस्थेच्या सर्वेक्षणाप्रमाणे ८३ टक्के खासदार हे कोट्यधीश असल्याचे समोर आले. अर्थातच भाजपाची खासदार संख्या जास्त असल्याने या कोट्यधीशांमध्ये भाजपाचे २२७ खासदार आहेत. काँग्रेसच्या चाळीस खासदारांपैकी सदतीस खासदारांकडे कोट्यवधीची मालमत्ता आहे. उमेदवारांनी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्राचा अभ्यास करून हा निष्कर्ष काढला गेला. प्रतिज्ञापत्रात दाखवली जाणारी रक्कम किंवा संपत्ती ही शंभर टक्के परिपूर्ण असते असे नाही. कारण आपली संपत्ती कमीत कमी आहे. हे दाखवण्याचा मार्ग म्हणजे ही प्रतिज्ञापत्रे असतात तरीसुध्दा निम्मे खासदार असे आहेत की त्यांची संपत्ती २५ ते ५० कोटीच्या दरम्यान पाहायला मिळते. जे खासदार आपली संपत्ती एक किंवा दोन कोटी आहे असे सांगतात त्यांच्यावर विश्वासच ठेवता येऊ शकत नाही. कारण कोणत्याही खासदाराला लोकसभेची निवडणूक लढवण्याकरीता किमान पाच कोटी आणि जास्तीत जास्त कितीही कोटी असा खर्च येत असतो आणि हा खर्च सगळ्या राजकारण्यांनी मान्य केलेला आहे. निवडणूक आयोगाच्या आचारसंहितेमध्ये उमेदवाराने प्रचारावर चाळीस लाखापर्यंत खर्च करण्याची मर्यादा घातलेली आहे. परंतु वस्तुस्थिती तशी नाही. चाळीस लाखामध्ये चार मोठ्या सभाही होऊ शकत नाही. आणि प्रचार साहित्याचे वाटप करण्याकरीता किमान पन्नास लाखापर्यंतचा खर्च सहजपणे होत असतो. हल्ली कार्यकर्ते फुकट काम करीत नाहीत. उलट भाड्याची माणसे आणण्याकरीता कार्यकर्त्यांनाच मोबदला द्यावा लागतो.

## लोकशाहीचा बाजार

असा हा लोकसभा निवडणुकीचा वाढता खर्च भागवण्याकरीता तितकीच दमदार कमाई या पाच वर्षाच्या काळात करावी लागते. केलेल्या खर्चापेक्षा शंभर पट कमाई केली तरच पुन्हा निवडून येण्याची किंवा तिकीट मिळण्याची खात्री असते. पाच कोटी खर्च केल्यानंतर पाचशे कोटीची तरी माया जमा झाली पाहिजे. असा त्या लोकांचा अतिशय ढोबळ हिशोब असतो. आणि मग लोकसभेतल्या ५४७ खासदारांपैकी ५२१ खासदार कोट्यधीश आहेत. असा निष्कर्ष अगदी सहजपणे निघतो. परंतु ज्याच्याकडे एक कोटीची रक्कम किंवा संपत्ती आहे त्याला कोट्यधीश म्हणून चालणार नाही कारण आज पैशाचे मूल्य किंवा मोजमापही बदलले आहे. ज्याप्रमाणे पाच रुपयाच्या नोटेला आज कोणी विचारत नाही त्याप्रमाणे राजकारणाचा घोडे बाजार लाखाच्या भाषेत चालतच नाही. तिथे अनेक कोटींची भाषा चालते. आणि त्या बाजारात आपली किंमत टिकून ठेवण्यासाठी छुप्या पध्दतीने संपत्ती वाढवतच न्यावी लागते. खासदारांची ही कोटीच्या कोटी उड्डाणे कमी होण्याऐवजी वाढताना दिसतात. अर्थात राजकारणाचा एकदा धंदा झाला आहे असे म्हटल्यानंतर असाच पैसा कमावण्यासाठी निवडणूक लढवणे असेच त्याचे स्वरुप राहाणार आहे. यामध्ये त्या खासदाराची किंवा ज्या पक्षाची किंमत तर ठरत असते. पण लोकशाही नावाच्या तत्त्वाचे मूल्य नाहीसे होते. म्हणूनच लोकशाहीचा उदघोष फक्त निवडणुकीच्या काळात ऐकायला मिळतो. एरवी लोकशाहीला विचारतो कोण असेच त्याचे चित्र राजकारण्यांनी तयार केलेले आहे. विशेषतः गेल्या पंचवीस ते तीस वर्षामध्ये ही विचित्र परिस्थिती निर्माण झाली. मतदार जरी उमेदवार निवडून देत असले तरी तो या मतदारांना बांधील राहात नाही. अधिकाधिक पैसा गोळा करण्याच्या बाजारूपणालाच तो बांधील असतो. निवडणुकांना लोकशाहीचा सर्वात मोठा उत्सव मानला जातो. पण त्या उत्सवात जर मूल्यांचाच लिलाव होत असेल तर त्याला बाजार म्हटलेलेच योग्य ठरते.

## अशांना अपात्र ठरवा

या निवडणुकांमधून पैसा कमावणारेच विजयी होतात. किंबहुना गेल्या पाच वर्षात त्याने आपली पैसा कमावण्याची पात्रता किती वाढवली आहे. याचेच मोजमाप केले जाते. दुर्दैवाचा आणखी एक भाग असा की या सगळ्या गोष्टी सर्व राजकीय नेत्यांच्या डोळ्यादेखत घडत असतात. पण कोणीही त्याचा बंदोबस्त करण्याची इच्छा दाखवत नाही. उलट त्याला खतपाणी घालण्याचे काम या लोकांकडून होत राहाते. आज सामान्य मतदाराला पर्याय शिल्लक नसल्याने त्याला मतदान करणे भाग पडते. जर निवडणुकीचा खर्च सरकारकडून उचलला गेला तर या उमेदवारांच्या कमाईवरही अंकुश आणता येईल. किंबहुना अशा राजकारणाचे व्यापारीकरण काही प्रमाणात रोखता येईल. प्रत्येक खासदाराला प्रतिज्ञापत्र लिहून द्यावे लागते. आणि आता आपली संपत्ती किती आहे हे त्याला घोषित करावे लागते. परंतु कोणीही खासदार प्रामाणिकपणे संपत्ती जाहीर करीत नसतो. सरकारकडेच त्यांच्या कमाईचा तपाशील उपलब्ध असायला हवा. लोकसभा सचिवालय, निवडणूक आयोग आणि इनकम टॅक्स या तीनहीविभागांच्या माध्यमातून खासदारांच्या कमाईची नाकेबंदी करता येऊ शकते. पाच वर्षात एका विशिष्ट मर्यादेच्यावर जर संपत्ती कमावली गेली. तर अशा खासदाराला निवडणुकीतूनच अपात्र ठरवले पाहिजे. त्याचा कितीही मोठा व्यवसाय जरी असला तरी पाच वर्षातला संपत्ती वाढीचा वेग एका विशिष्ट टप्प्यापर्यंतच राहू शकतो. तो दुप्पट होऊ शकत नाही.